www.sahyandrinews.com

Scan QR code to visit ... Epaper Portal

दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit ... Epaper Portal

(महाराष्ट्र) वर्ष ०१ ले अंक १६२ Title - Code :- MAHMAR49513 गुरुवार दि.१४ मार्च २०२४ पाने ४ पान १ मो. ९०११७ ०८८४० किंमत २ रु.

### तिकिट कापण्यासाठी मुख्यमंत्र्यांना भीती संपवा

# वजन वापरा म्हणणाऱ्या सुधीर मुनगंटीवारांना लोकसभेचं तिकीट, चंद्रपुरात कुणाला गुलाल?

**मुंबई (वृत्तसंस्था)– आगामी लोकसभा निवडणुकीसाठी भाजपकडून दुसऱ्या यादीमध्ये महाराष्ट्रातील २० जागांवर उमेदवार घोषित करण्यात आले आहेत. यामध्ये विदर्भातील १० पैकी चार जागांवर भाजपने उमेदवार घोषित केले आहेत. मंत्री सुधीर मनगंटीवार यांना चंद्रपूरमधून उमेदवारी दिली आहे. मात्र, सुधीर मुनगंटीवार गेल्या काही दिवसांपासून लोकसभेच्या रिंगणात नको यासाठीच प्रयत्न करत होते का? अशी चर्चा रंगली होती.**

मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत झालेल्या जाहीर कार्यक्रमामध्ये आपल्याला उमेदवारी नकोच असं म्हटलं होतं. शक्य असेल तर उमेदवारी कट करण्यासाठी आपलं वजन वापरा असेही शब्द वापरले होते. मात्र, आता ते सुधीर मुनगंटीवार चंद्रपूरच्या लोकसभेच्या रिंगणात असतील. त्यामुळे त्यांच्या विरोधात कोण असेल हे महाविकास आघाडीचे जागावाटप झाल्यानंतर निश्चित होईल. नागपूर लोकसभेमधून सलग तिसऱ्यांदा नितीन गडकरी यांना उमेदवारी देण्यात आले आहे. पहिल्या यादीमध्ये नितीन गडकरी यांचे नाव न आल्याने राजकीय भूवया उंचावल्या गेल्या होत्या. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून राज्यातील महाविकास आघाडीमधील नेत्यांकडून गडकरी यांना थेट पक्षप्रवेशाच्या ऑफर देण्यात आल्या होत्या. उद्धव ठाकरे यांनी सुद्धा महाविकास आघाडीकडून निवडणूक लढवण्याचा आवाहन केले होते. मात्र, त्यांनी त्या सर्व चर्चा फेटाळून लावल्या होत्या. दुसरीकडे, भाजपने



अकोलामधून उमेदवार बदलताना अनुप धोत्रे यांना उमेदवारी दिली आहे. अनुप धोत्रे हे विद्यमान खासदार संजय धोत्रे यांचे चिरंजीव आहेत. वर्धामधून सलग तिसऱ्यांदा रामदास तडस यांना उमेदवारी दिली आहे. एकूण चार जागांवर भाजप उमेदवार जाहीर केले आहेत. अजूनही सहा जागांवर भाजपकडून उमेदवारांची प्रतीक्षा कायम आहे. सुधीर मुनगंटीवार यांनी उमेदवारी चर्चेच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांना उद्देशून बोलताना म्हणाले होते की, खरं तर ही संसद नवीन तयार झाली त्या दरवाज्याचा लाकूड आम्ही इथून, याच भागातून पाठवलं. फक्त असं होऊ नये की त्या दरवाज्यातून जायची आवश्यकता पडेल. ही मात्र भीतीपोटी भिती आहे आणि राज्य गीत तुमच्या अनुमतीने निवडलं आणि त्यामध्ये शेवटचे शब्द दिल्लीचेही तक्त राखतो महाराष्ट्र माझा हे कुठे आता माझ्यावर बंधन पडेल का ही भीती मला वाटते आहे. म्हणून परवा मी तुम्हाला म्हटलं की या भीतीतून मला मुक्त करण्यासाठी तुम्ही तुमचं वजन वापराव हे सुद्धा मी तुम्हाला सांगितलं.

# रेल्वे प्रवासी संघातर्फे बल्लारशाह एक्सप्रेसचे हर्षोल्लासात स्वागत



**वरोरा । प्रतिनिधी**

रेल्वे मंत्रालयाच्या आदेशानुसार १२ मार्च २०२४ पासून ' स्पेशल ' शब्द वगळून नव्या गाडी क्रमांकावर लोकमान्य टिळक टर्मिनस – बल्लारशाह ( २२१०९ – बल्लारशाह सुपर फास्ट ) ही साप्ताहिक ट्रेन सुरु करण्यात आली आहे. वरोरा रेल्वे स्टेशनवर या गाडीचा थांबा देण्यात आला आहे. सदर गाडी वरोरा स्थानकात थांबताच, वरोरा – भद्रावती – चंद्रपूर रेल्वे प्रवासी संघ व अन्य सामाजिक संघटनांच्या वतीने नारळ फोडून, गुलाल उधळून व पेढे वाटून ' बल्लारशाह एक्सप्रेस ' चे जंगी स्वागत करण्यात आले.

वरोऱ्यात ' बल्लारशाह सुपर फास्ट एक्सप्रेस ' थांबणार म्हणून १३ मार्चच्या सकाळपासूनच रेल्वे प्रवासी संघाच्या पदाधिकारी, सदस्य व सामाजिक कार्यकर्त्यांनी रेल्वे स्टेशनवर एकच गर्दी केली होती. वरोऱ्याला सकाळी १०.१९ वाजता येणारी ' २२१०९ डाऊन बल्लारशाह एक्सप्रेस ' पहिल्या दिवशी १०.२८ वाजता आली. वरोरा रेल्वे स्टेशनवर ' बल्लारशाह एक्सप्रेस ' चे आगमन होताच जल्लोषाने गुलाल उधळून व पेढे वाटून आनंद व्यक्त करण्यात आला. यावेळी रेल्वे प्रवासी संघाचे अध्यक्ष राजेंद्र मर्दाने व सामाजिक कार्यकर्त्यांनी स्टेशन मास्टर चेतन मीना , ' बल्लारशाह एक्सप्रेस ' चे चालक कैलास काळपांडे व सहायकाचा पुष्पगुच्छ देऊन व हार टाकून सत्कार केला. गाडी चालक काळपांडे यांनी मागील काही वर्षांपूर्वीच्या घटनेला उजाळा दिला. ते म्हणाले की, आनंदवन एक्सप्रेस जेव्हा प्रथमतः वरोरा रेल्वे स्टेशनवर आली होती त्यावेळी मीच चालक होतो आणि त्यावेळीसुद्धा प्रवासी संघातर्फे असेच स्वागत करण्यात आले होते . यानिमित्ताने रेल्वे प्रवासी संघातर्फे रेल्वे मंत्री ना. अश्विनी वैष्णव यांनी ' स्पेशल ' शब्द वगळून प्रवाशांना दिलासा दिल्याबद्दल त्यांचे व मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक राम करण यादव, मध्य रेल्वेचे डीआरएम मनीष अग्रवाल यांचे आभार मानण्यात आले. यावेळी वरोरा– भद्रावती – चंद्रपूर रेल्वे प्रवासी संघाचे अध्यक्ष राजेंद्र मर्दाने, बळवंतराव शेलवटकर, खेमचंद नेरकर, प्रवीण सुराना, जगदीश तोटावार, मयूर दसुडे, मधुसूदन टिपले, संदीप गांधी, तुषार मर्दाने, कालूराम रामपूरे, अमित मांडवगडे वरोरा रेल्वे स्टेशन व्यापारी मंडळाचे पदाधिकारी रामदर्शन गुप्ता, प्रशांत केशवाणी, वरोरा चौकीचे आर.पी.एफ विपीन दातीर आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वरोरा आर.पी. एफ.चौकी इन्चार्ज आर. के. यादव, उपस्टेशन प्रबंधक सचिन गुप्ता, प्रवासी संघाचे सचिव जितेंद्र चोरडिया, प्रवीण गंधारे, राहुल देवडे, बबलू रॉय आदींचे सहकार्य लाभले.

# पिटलाइन सुविधेमुळे बल्लारशाहचे महत्व वाढले - हंसराज अहीर

### लांब पल्ल्यांच्या गाड्या लवकरच सुरू होणार




**चंद्रपूर । प्रतिनिधी**

बल्लारपूर येथे बल्लारशाह–लोकमान्य टिळक टर्मिनस मुंबई सुपरफास्ट ट्रेन (क्रमांक २२१०९/२२११०) ला राष्ट्रीय ओबीसी आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांनी हिरवी झेंडी दाखवली.

दि. १३ मार्च रोजी या कार्यक्रमप्रसंगी बोलतांना हंसराज अहीर म्हणाले की बल्लारशाहमध्ये ११ कोटी रुपये खर्चुन बांधण्यात आलेल्या पिटलाइनच्या सुविधेमुळे आता रेल्वे प्रवाशांना लांब पल्ल्यांच्या गाड्यांची सुविधा मिळणार असल्याचे सांगितले. यासंदर्भात बल्लारशाह–लोकमान्य टिळक टर्मिनस मुंबई सुपरफास्ट ट्रेन आज सुरु करण्यात आली आहे. बल्लाशाह रेल्वे स्थानकाचे महत्व पिटलाईनमुळे वाढले आहे. अहीर पुढे म्हणाले की, पूर्वी सहा डब्यांची आरक्षण असलेली सेवाग्राम लिंक एक्सप्रेस येथे धावत असे. लिंक एक्सप्रेस गाड्या आता संपुर्ण भारतात बंद करण्यात आल्या आहेत म्हणुन ही गाडी सुरू करण्यात आली आहे. लवकरच नंदीग्राम ही ट्रेन दररोज धावणार आहे. तसेच आता पुण्यासाठीची ट्रेन आठवड्यातुन तीन दिवस धावणार असून, ती येत्या दोन–तीन दिवसांत सुरू होईल. माननिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी चंद्रपूर आणि बल्लारशाहसाठी रेल्वेच्या अनेक सुविधा दिल्या आहेत, असेही अहीर म्हणाले.

उल्लेखनीय बाब अशी की, एलटीटी–बल्लारशाह सुपरफास्ट एक्सप्रेस (क्रमांक ०११२७/०११२८) या गाडीला पूर्वी विशेष दर्जा होता, या ट्रेनचे भाडे प्रवाशांना परवडणारे नव्हते. विशेष दर्जा असल्याने ही ट्रेन नेहमीच उशिराने धावत असे. प्रवाशांच्या समस्या लक्षात घेऊन हंसराज अहीर यांनी या ट्रेनचा विशेष दर्जा काढून घेतला आहे. आता ही ट्रेन नव्या क्रमांकाने धावत असून, आता या ट्रेनच्या भाड्यातही ३० टक्के कपात करण्यात आली आहे, त्यामुळे रेल्वे प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे. सदर ट्रेन चंद्रपूर रेल्वेस्थानकावर पोहचताच भाजप कार्यकर्त्यांनी या ट्रेनचे जल्लोषात स्वागत केले. यावेळी महाराष्ट्र वनविकास महामंडळाचे माजी अध्यक्ष चंदनसिंह चंदेल, भाजपाचे जिलाध्यक्ष हरीश शर्मा, विजय राऊत, खुशाल बोंडे, रेल आधिकारी, एडीआरएम पी एस खेरकर, एसीएम एच के बेहरा, दामोदर मंत्री, लखन सिंह चंदेल, अनिल फुलझले, चंद्रपुर जिल्हा रेलवे यात्री एसोसिएशनचे अध्यक्ष श्रीनिवास सूंचूवार, रघुवीर अहीर, अरुण मस्की, राजु घरोटे, विनोद शेरकी, रेणुका दूधे, वैशाली जोशी, जयश्री मोहुर्ले, स्वामी रायबरम, देवेंद्र वाटकर, कांता ढोके, किशोर मोहुर्ले, आरती आक्केवार, हनुमानसिंह खेंगर, रामेश्वर पासवान, जुम्मन शेख, ममता बोज्जा, गुलशन खान, गुलशन शर्मा, विकास राजुरकर, ज्ञानेंद्र आर्य, गणेश सैदाने व रेलवे कर्मचारी कृष्णकुमार सेन, एम वेंकटेश्वरलू, जी राजूरकर, रविंद्र नंदनवार, रवी मिश्रा, योगेश बविस्कर, आरपीएफ चे निरीक्षक श्री पाठक आदी उपस्थित होते. चंद्रपूर स्थानकावर या ट्रेनचे स्वागत रेल्वे संघर्ष समितीचे रमणिकभाई चव्हाण, विनोद बजाज, नरेंद्र सोनी, प्रदीप माहेश्वरी, डॉ. भुपेश भलमे, डॉ. अशोक रोहरा, मिलींद दाभेरे, संजय मंथाने, अशोक बोथरा, नरेश लेकवानी, भाजपचे विठ्ठल डुकरे, मायाताई उईके, वंदना संतोषवार, प्रदीप किरमे, राजेंद्र तिवारी, अविनाश राखुंडे, प्रमोद शास्त्रकार, बि.बि. सिंह, शालु कन्नोजवार, राजेंद्र कागदेलवार, संजय खनके, मधुकर राउत, सुरेश यादव, मयुर भोकरे, प्रणय डंभारे, बाळा चंदनखेडे, चेतन शर्मा, पराग मलोडे, रेणुकाताई घोडेस्वार, किशोर बंडावार, नरेंद्र गुजराथी यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# दिंडोरी लोकसभा पवार गट तर नाशिक लोकसभा मतदार संघातून ठाकरे गटाचा उमेदवार–शरद पवार

**नाशिक**–प्रकाश आंबेडकर यांनी महाविकास आघाडी सोबत सहभागी करून घेण्याचा आमचा प्रयत्न आहे. मात्र, लोकसभा निवडणुकीला वेळ कमी असल्यामुळे आम्ही सर्व तयारीला लागलो असल्याचे शरद पवार यांनी म्हटले आहे. जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहोचण्याचा आमचा प्रयत्न असल्याचेही शरद पवार यांनी म्हटले आहे. इतकेच नाही तर दिंडोरी लोकसभा मतदार संघ हा पवार गट तर नाशिक लोकसभा मतदार संघातून ठाकरे गटाचा उमेदवार असेल अशी घोषणा देखील शरद पवार यांनी केली. जागावाटपचे काम जवळजवळ संपले असून लवकरच अंतिम निर्णय होईल, अशी माहिती देखील त्यांनी नाशिकमध्ये माध्यमांना दिली.

राज्यात विशेषतः शेतकरी वर्ग हा सत्ताधारी पक्षावर नाराज असून राज्यातील वातावरण हे महाविकास आघाडीला अनुकूल असल्याचा दावा शरद पवार यांनी केला आहे. नाशिकमध्ये शेतकऱ्यांची भेट घेतल्यानंतर शरद पवार यांनी पत्रकारांशी संवाद साधला. नाशिक, धुळे, सातारा, पुणे आदी कांदा उत्पादक जिल्ह्यामध्ये सरकारच्या विरोधात मोठी नाराजी असल्याचा दावा शरद पवार यांनी केला आहे. ऊस हे महाराष्ट्राचे प्रमुख पीक आहे. ऊस आणि इथेनॉल निर्मिती याबाबत केंद्र सरकारचे धोरण योग्य नसल्याने ऊस उत्पादक शेतकरी देखील सरकारवर नाराज



असल्याचे शरद पवार यांनी म्हटले आहे.याबरोबर अन्य पिकांच्या संदर्भातल्या किमती संदर्भात शेतकरी वर्ग नाराज असल्याचा दावा शरद पवार यांनी केला आहे. एकीकडे शेतकरी वर्ग नाराज आहे तर दुसरीकडे बेरोजगारी आणि महागाई यामुळे सर्वसामान्य नागरिक देखील अस्वस्थ असल्याचे शरद पवार यांनी म्हटले आहे. या सर्वाचा परिणाम होणार असून त्याची किंमत सत्ताधारी पक्षाला मोजावी लागणार असल्याचा दावा शरद पवार यांनी केला आहे.सत्ताधारी पक्षाचे एकंदरीत कामकाज हे विरोधी पक्षावर म्हणजेच आमच्यावर हल्ला करण्याचे त्यांचे धोरण असल्याचे शरद पवार यांनी म्हटले आहे. ईडी, सीबीआय अशा तपास संस्थांचा वापर विरोधकांनी अडकवण्यासाठी केला जात असल्याचे शरद पवार म्हणाले. मात्र या कारवाई विरोधात जेव्हा विरोधक कोर्टात जातो, तेव्हा कोर्टाचा निकाल हा सरकारच्या विरोधात जात असल्याचे शरद पवार यांनी म्हटले आहे.

### राज्यात उष्णतेची लाट दिवसागणिक तीव्र

# पुढील पाच दिवस तापमानात वाढ होणार

**पुणे**–राज्यात उन्हाचा चटका चांगलाच वाढत आहे. राज्यातील बहुतांशी भागांमध्ये कमाल तापमानाचा पारा आता असह्य होत आहे. अनेक जिल्ह्यांत तापमानाचा पार ३७ अंशांच्या पुढे गेला आहे. आता पुढील पाच दिवस राज्यात तापमानात वाढ होण्याचा अंदाज आहे. त्यामुळे राज्यात उष्णतेची लाट दिवसागणिक अधिकच तीव्र होणार आहे.

गेले काही दिवस वातावरणात पहाटे गारवा जाणवत होता. मात्र आता तो सुद्धा कमी झाला आहे. विदर्भ, मराठवाड्यात काहीसे ढगाळ हवामान पाहायला मिळणार आहे. मात्र तरीही उकाड्यापासून दिलासा मिळणार नसल्याचे हवामान खात्याने म्हंटले आहे. तसेच पुढील पाच दिवस राज्यातील हवामान कोरडे राहील असा अंदाज हवामान विभागाने दिला आहे.दरम्यान, उत्तरेकडील काही राज्यांमध्ये पावसाच्या तुरळक सरींसह पर्वतीय क्षेत्रांमध्ये हिमवृष्टीची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. मात्र असं असतानाही हिमाचल प्रदेश, जम्मू काश्मीर आणि उत्तराखंडमधील हवामानाच्या या स्थितीचे महाराष्ट्रातील वातावरणावर फारसे परिणाम होताना दिसत नाही.तसेच काही दिवसांपूर्वीच्या राज्यात अवकाळीच्या माऱ्यानंतर विदर्भ आणि मराठवाडा भागावर सध्या ढगांची चादर अधूनमधून पाहायला मिळत आहे. मात्र सध्या राज्यात पावसाची शक्यता नाही. उलट या ढगाळ वातावरणामुळं आता उष्णतेचा दाह आणखी जाणवण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन हवामान खात्याने केले आहे.मंगळवारी सकाळपर्यंतच्या २४ तासांत वाशीम येथे राज्यातील उच्चांकी ३९.४ अंश सेल्सिअस, सोलापूर येथे ३९.२, यवतमाळ येथे ३९ अंश सेल्सिअस तापमान नोंदले गेले. विदर्भ, मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात काही ठिकाणी कमाल तापमान ३८ अंशांच्या पुढे गेले आहे.

# अहमदनगरचे नामकरण पुण्यश्लोक अहिल्यादेवी नगर करण्यास मान्यता

**मुंबई**–मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत विविध महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या या मंत्रिमंडळ बैठकीस उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचेसह मंत्रिमंडळातील सदस्य उपस्थित होते. यात अहमदनगर शहराचे नामकरण हे पुण्यश्लोक अहिल्यादेवी नगर करण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे. याबरोबरच पुणे जिल्ह्यातील वेल्हे या तालुक्याचे नाव राजगड करण्यास देखील राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे.मुंबई उपनगरातील आठ रेल्वे स्थानकांची ब्रिटिशकालीन नावे बदलण्यात देखील आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. या आठवड्यात लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागण्याची शक्यता वर्तवली जात असताना राज्य मंत्रिमंडळाने अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत.



# सुधीरभाऊ हे दूरदृष्टी लाभलेले लोकप्रतिनिधी–मुख्यमंत्री शिंदे

## बॉटनिकल गार्डनच्या लोकार्पण सोहळ्यात ना.मुनगंटीवार यांच्या कार्यशैलीचे कौतुक

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

एखादे काम हाती घेतले की पूर्ण शक्ती पणाला लावून ते पूर्णत्वास नेणारे मंत्रीमंडळातील माझे वरीष्ठ सहयोगी सुधीरभाऊ हे दूरदृष्टी लाभलेले लोकप्रतिनिधी आहेत, या शब्दांत राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ना. सुधीर मुनगंटीवार यांचे कौतुक केले.

चंद्रपूर येथील विसापूर बॉटनिकल गार्डनचे लोकार्पण, एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या महर्षी कर्वे महिला सक्षमीकरण ज्ञान संकुलाचे भूमिपूजन तसेच चंद्रपूर महानगरपालिकेच्या अमृत २ योजने अंतर्गत पाणीपुरवठा व मलनिस्सारण प्रकल्पाचे भूमिपूजन करताना ते बोलत होते.यावेळी राज्याचे वने सांस्कृतिक कार्य मंत्री तथा चंद्रपूरचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार, खासदार अशोक नेते, आमदार किशोर जोरगेवार, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, भाजपा जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा,महानगराचे जिल्हाध्यक्ष राहुल पावडे,वनविभागाचे प्रधान सचिव बी. वेणूगोपाल रेड्डी, प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा वनबल प्रमुख शैलेश टेंभुर्णीकर, प्रधान मुख्य वनसंरक्षक महीप गुप्ता, एसएनडीटी विद्यापीठाच्या कुलगुरू उज्वला चक्रदेव, जिल्हाधिकारी विनय गौडा, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, मनपा आयुक्त विपीन पालीवाल, डॉक्टर जितेंद्र रामगावकर आदींची प्रमुख उपस्थिती होती.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या भाषणातून ना. सुधीरभाऊंचा गौरव केला त्यावेळी टाळ्यांचा कडकडाट झाला. 'सुधीरभाऊंसारखे दूरदृष्टी लाभलेले लोकप्रतिनिधी चंद्रपूरला लाभले, हे जिल्ह्याचे भाग्य आहे. प्रत्येक विषयाची जाण असलेल्या सुधीरभाऊंनी चंद्रपूर जिल्ह्यात विकासाची गंगा आणली,' असे सांगतानाच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ना. श्री. सुधीर मुनगंटीवार यांच्या मंत्रालयांमार्फत होणाऱ्या कामांचेही कौतुक केले. 'यापूर्वीच्या कार्यकाळात अर्थमंत्री असताना आणि आता वनखाते व सांस्कृतिक खात्याचे नेतृत्व करताना सुधीर मुनगंटीवार यांनी राज्याच्या विकासात मोठे योगदान दिले आहे.त्यांच्या उपक्रमशीलतेमुळे वन खाते व सांस्कृतिक खाते बहरले आहे.' यावेळी मुख्यमंत्र्यांनी ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या सांस्कृतिक जाणीवांचाही आवर्जून उल्लेख केला. 'सुधीरभाऊंनी सांस्कृतिक कार्य विभागाला एक ऊर्जा दिली आहे. आपल्या संस्कृतीची, परंपरांची जोपासना कशी करायची, ऐतिहासिक वारशाचे संवर्धन कसे करायचे, याचा पाठच सांस्कृतिक विभागाने घालून दिला आहे. सुधीरभाऊंच्या नाविन्यपूर्ण कल्पना आणि कामातील सातत्यामुळे हे शक्य झाले आहे,' असे मुख्यमंत्री म्हणाले.



# किती कोटींचा घोटाळा त्यानुसार भाजपात प्रवेश:पंतप्रधान मोदींवर उद्धव ठाकरेंचा हल्लाबोल

**यवतमाळ (वृत्तसंस्था)**–यवतमाळच्या पुसदमध्ये मंगळवारी सायंकाळी उद्धव ठाकरे यांची जाहीर सभा पार पाडली. यावेळी बोलताना त्यांनी पुन्हा पंतप्रधान नरेंद्र मोदींवर टीकास्त्र सोडले. ठाकरे म्हणाले की, मोदीजी समोरच्याला किती कोटींचा घोटाळा केलाय असे विचारुन पक्षात घेतात. ५-१० कोटींचा घोटाळा करणाऱ्यांना फक्त पक्षात एंट्री तर ७० हजार कोटींचा घोटाळा करणाऱ्याला उपमुख्यमंत्री करतात. मग मुख्यमंत्री झालेल्या व्यक्तीने किती कोटींचा घोटाळा केला असेल, याचा विचार करा, असे म्हणत ठाकरेंनी एकनाथ शिंदेंसह अजित पवारांवर देखील हल्लाबोल केला. उद्धव ठाकरे म्हणाले की, मोदींना काही दिवसांपूर्वी कोणी तरी (भावना गवळी) राखी बांधली होती मोदी सत्तेत येईपर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करतो, असे म्हणायचे. पण आता उलट शेतीत लागवडीचा खर्च दुप्पट झाला आहे. एकाही शेतकऱ्याने उत्पन्न दुप्पट झाल्याचे सांगावे. मी त्याचा सत्कार करेन, असा टोलाही ठाकरेंनी लगावला.पुढे बोलताना उद्धव ठाकरे यांनी दुसऱ्यांदा नितीन गडकरी यांना आपल्या पक्षात येण्याची ऑफर दिली आहे. ते म्हणाले की, दोन दिवसांपूर्वी मी बोललो होतो, गडकरीजी जर मोदी उमेदवारी देत नसेल तर आमच्याकडे या. आम्ही उमेदवारी देतो आणि अधिकाराने काम करण्यासाठी मंत्रीपदही देऊ. देशात आमचं सरकार येणार आहे.गडकरीजी का झुकता त्यांच्यासमोर, दाखवा त्यांना महाराष्ट्राचा पाणी काय आहे, अशा शब्दांत उद्धव ठाकरे यांनी नितीन गडकरींना पुनश्च: आपल्या पक्षात येण्याचे जाहीर आमंत्रण दिले. उद्धव ठाकरे यांनी यापूर्वी दिलेल्या प्रस्तावावर गडकरी यांनी अद्याप कोणतेही भाष्य केलेले नाही. परंतु, आता दुसऱ्यांदा उद्धव ठाकरे यांनी ऑफर दिल्यानंतर गडकरी काही बोलणार का, याकडे राजकीय वर्तुळाच्या नजरा लागल्या आहेत.मोदी सरकारने देशात आता नागरिकत्त्व सुधारणा कायदा आणला आहे. त्यामुळे अन्य देशातील नागरिकांना नागरिकत्त्व मिळणार आहे. त्याबाबत काही आक्षेप नाही. पण मोदी सरकारला सीएए कायद्याचा वापर करुन धर्माधर्मात तेढ निर्माण करायची आहे.लाखो काश्मिरी पंडित घर सोडून गेले. आधी त्यांना काश्मीरमध्ये परत आणा, मग सीएए कायदा आणा. मणिपूरमध्ये हिंदू नाहीत का? पंतप्रधान मोदी समुद्राच्या बुडाशी जातात मग त्यांना मणिपूरला जाता येत नाही का? तुमच्या दहा वर्षांच्या सत्तेनंतरही राज्यात हिंदू जनआक्रोश मोर्चे का काढावे लागत आहेत? , असा सवाल उद्धव ठाकरेंनी उपस्थित केला. मोदी पूर्वी म्हणायचे की, अच्छे दिन आऐंगे, पण मी म्हणतो, मोदीजी तुमची सत्ता गेल्यावरच देशात अच्छे दिन येतील, असा टोला उद्धव ठाकरे यांनी लगावला.



## समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी महिलांचे योगदान महत्त्वाचे –आ. संग्राम जगताप



**अहमदनगर । दैनिक राज आनंद**

समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी महिलांचे योगदान महत्त्वाचे ठरत आहे. समाज घडविण्यापासून ते संस्कार रुजविण्यापर्यंत महिला कार्य करत आहे. अनेक क्षेत्रात महिला यशोशिखरावर आहेत. प्रत्येक पुरुषाच्या यशामागे एक महिला असते. चुल आणि मूलच्या पलीकडे जावून वेगवेगळ्या क्षेत्रात महिलांनी आपले कर्तृत्व सिद्ध केले असल्याचे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

राष्ट्रवादी युवती सेलच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त शहरातील महिला शिक्षिका, प्राध्यापिका व मुख्याध्यापिकांचा सन्मान करण्यात आला. यावेळी आमदार जगताप बोलत होते. याप्रसंगी राष्ट्रवादीचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, राष्ट्रवादी युवतीच्या शहर जिल्हाध्यक्षा ड. अंजली आव्हाड, राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष अभिजीत खोसे, विधानसभा अध्यक्ष सुमित कुलकर्णी, क्रीडा सेलचे शहर जिल्हाध्यक्ष घनश्याम सानप, साधनाताई बोरुडे, दीपालीताई आढाव, योगिता कुडिया, विद्या सोनवणे, स्नेह चव्हाण, कीर्ती गुरप, कार्तिकी बोधले, प्रेमा जावळे, कल्पना गुगळे आदींसह युवती सेलच्या पदाधिकारी व महिला शिक्षिका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.पुढे आमदार जगताप म्हणाले की, महिला शिक्षिका सक्षम समाज उभारणीचे काम करत आहे. पिढी घडविण्यासह त्यांच्यात संस्कार ते रुजवित आहे. समाजासाठी महिलांचे योगदान प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले.अंजली आव्हाड म्हणाल्या की, समाजात प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून महिला कार्य करत आहेत. राज्यात महिला धोरण लागू झाल्याने महिलांचा सन्मान आनखी वाढला आहे. समाजात पिढी घडविणाऱ्या महिला शिक्षिकांचा सन्मान करुन वेगळ्या पध्दतीने महिला दिन साजरा करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. राष्ट्रवादीच्या माध्यमातून वेळोवेळी सत्कार व सन्मान करुन नेहमीच प्रोत्साहन देण्याचे काम करण्यात आल्याचे उपस्थित शिक्षिकांनी भावना व्यक्त केल्या.

## निवडणूक कामात क्षेत्रिय अधिकारी महत्वाचा घटक आहे-जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशीया

### निवडणूक कामात अधिकारी व कर्मचारी यांनी दक्ष राहावे

**उमरखेड । प्रतिनिधी**

आज दिनांक १२मार्च २०२४ रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर वाचनालय छत्रपति संभाजी महाराज उद्यान उमरखेड येथे जिल्हाधिकारी तथा निवडणूक अधिकारी यवतमाळ डॉ पंकज आशीया यांचे अध्यक्षते नोडल अधिकारी व सेक्टर अधिकारी सेक्टर पुलिस अधिकारी यांची आढावा सभा घेण्यात आली. २०२४ लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने लोकसभा मतदार संघातील निवडणूक प्रक्रिया सुरळीत शांततेत व पारदर्शकपणे पारपाडावी या साठी नेमण्यात आलेल्या अधिकारी कर्मचारी वर्गाने कर्तव्यात कसुर न ठेवता दक्ष रहावे. असे निर्देश जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ पंकज आशिया यांनी दिले. १५ हिंगोली लोकसभा मतदार संघात उमरखेड विधानसभा मतदार संघ समाविष्ट आहे. उमरखेड येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर वाचनालय छत्रपति संभाजी महाराज उद्यान उमरखेड येथे अधिकारी कर्मचारी यांची कामकाजाचा आढावा सभा घेण्यात आली डॉ पंकज आशीया यांनी यावेळी मार्गदर्शन केले. त्यांनी उमरखेड विधानसभा मतदार संघातील मतदान केंद्र तेथील उपलब्ध सुविधा व सुरक्षा या विषयीचा आढावा घेतला. बैठकीत मार्गदर्शन करताना म्हणाले की निवडणुकीचे काम हे अत्यंत जबाबदारी चे असते. अधिकारी कर्मचारी वर ज्या कामाची जबाबदारी सोपविलेली आहे त्या कामाची त्यांनी पूरे-पूरे माहिती करुन घ्यावी म्हणजे दिलेली जबाबदारी यशस्वीपने पार पाडण्यास अडचन येनार नाही. मतदान केंद्रच्या ठिकाणी विज पाणी व इतर आवश्यक सुविधा संबंधित यंत्रनेनी तातडीने उपलब्ध करून द्याव्यात अशा सूचना ही त्यांनी बैठकीत दिल्या व या निवडणूकी साठी जाहिर झालेल्या आचार संहितेच्या काळात कोणी ही आचार संहितेचे उल्लंघन करू नये असे आवाहन हि जिल्हाधिकारी डॉ पंकज आशिया यांनी केले. या सभेला उपविभागीय अधिकारी तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ सखाराम मुळे, उमरखेड तहसीलदार आर यू सुरडकर, गट विकास अधिकारी प्रविण कुमार वानखेडे, न.प. मुख्य कार्यकारी अधिकारी महेश जामनोर,महागाव तहसीलदार सिध्देश्वर वरणगांवकर, नायब तहसीलदार वैभव पवार, नायब तहसीलदार एस डी पाईकराव, उमरखेड पोलीस निरिक्षक, आदि प्रमुख उपस्थित होते. या आढावा सभेला मतदार संघात नेमण्यात आलेल्या क्षेत्रिय अधिकारी तसेच इतर संबंधित अधिकारी, पोलीस विभागाचे अधिकारी, प्रतिनिधि आदि उपस्थित होते.




## मी कोणाच्या बापालाही मॅनेज होत नाही हे शिवाजीराव दादा पंडितांनाही माहित आहे-माजीमंत्री बदामराव पंडित

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातल्या गोरगरिबांना कोणी वेठीस धरलं?, शेतकऱ्यांचा ऊस बांधावर टाकून, त्याच्या मापात पाप कोणी केले ? आणि त्यांचा संसार उघड्यावर कोणी पाडला हे तमाम जनतेला माहित आहे. बदामराव पंडित हा कुणाच्या बापाला मॅनेज होत नाही हे खुद्द शिवाजीराव पंडित दादांनाही माहित आहे. गेवराई तालुक्याच्या जडणघडणीत ज्याचे किंचितही योगदान नाही आणि ज्याचे राजकीयदृष्ट्या अजून डोळेही उघडले नाहीत, त्या विजयसिंह पंडितांनी माझ्यावर बोलण्या अगोदर आपल्या वडिलांचा सल्ला घ्यावा, मगच बोलावे. विनाकारण कोल्हे कुई करू नये, असे रोखठोक प्रतिपादन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी केले आहे.



पत्रकारांशी संवाद साधताना बदामराव पंडित म्हणाले की, गेवराई तालुक्यातील संजय गांधी निराधार योजनेत विधवा, निराधार, अपंग आणि दुर्धर आजार असलेल्यांना शासनाकडून मानधन दिल्या जाते. परंतु गोरगरिबांची आडवणूक करण्यासाठी विजयसिंह पंडित यांनी प्रशासनावर दबाव टाकून हे मंजुरीचे काम रोखण्याचा केविलवाणा प्रयत्न केला. त्याबद्दल मी स्पष्ट भूमिका मांडल्यानंतर विजयसिंह पंडितांनी वर्तमानपत्रातून माझ्यावर आरोप केले. वास्तविक पाहता गेवराई मतदार संघातल्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांची अडवणूक करून बांधावर ऊस जाळण्याचे पाप बीडच्या पंडित कुटुंबाने केले आहे. त्यासोबत त्याच उसाच्या मापात पापही त्यांनीच केले आहे हे लोकांना माहिती आहे. मी लोकांसाठी प्रामाणिकपणे सातत्याने काम करतो आणि माझी भूमिका स्पष्ट असते. कोणाची तरी बी टीम होऊन तडजोडीचे राजकारण करणाऱ्या या बीडच्या पंडितांनी मला बी टीम म्हणत अफवा पसरविण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याला जनतेने कधीच भीक घातली नाही. आम्ही जनतेच्या बळावर आणि स्वतःच्या ताकतीवर स्वतंत्रपणे काम करतो. म्हणूनच तब्बल १५ वर्षे याच जनतेने मला आमदार केले, मंत्रीही केले आणि अपक्ष लढूनही ५२ हजार मते दिली. विरोधात असतानाही अमरसिंह पंडितांनी भाजप पक्ष सोडून राष्ट्रवादीत प्रवेश करून स्वतःच्या भाजप मधील मेव्हण्याला विधानसभेत मदत केली. आमच्या पाठीत विश्वासघाताचा खंजीर खुपसला हेही लोकांना माहित आहे. मी ज्या पक्षात गेलो त्याच राजकीय पक्षात अमरसिंह पंडित माझ्या मागे आले. ते कशासाठी आले? हे आता उघड झाले आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी पक्षाच्या चिन्हावर निवडणूक लढवून, पैशाचा पाऊस पाडत कार्यकर्त्यांना फोडूनही विजयसिंह पंडितांना लोकांनी का पाडले? याचा विचार करावा. सगळी सत्ता स्थाने देऊनही शरद पवार यांच्याशी शिवाजीराव पंडित दादांच्या कुटुंबाने गद्दारी करून विश्वासघात केला. याच्या मागचे खरे कारण काय? याबद्दल जनतेला उत्तर द्यावे. मला बदनाम करण्याचे षडयंत्र यापूर्वीही त्यांनी कित्येक वेळा केले पण त्याला जनतेने थारा दिला नाही, हे विसरू नका.

जर अमरसिंह पंडित आणि विजयसिंह पंडित यांनी तालुक्यातल्या गोरगरिबांची कामे केली असती, कोणाचे संसार मोडले नसते, तर असे २५ वर्षे लोकांनी त्यांना सत्तेपासून दूर ठेवले असते का? असा खडा सवाल करून बदामराव पंडित म्हणाले की, तालुक्याच्या आणि शहराच्या विकासासाठी मी सतत कामे केली आहेत. मोठ-मोठे प्रकल्प आणून शासकीय इमारती सुद्धा लोकहितासाठी उभा केल्या आहेत. परंतु आपण सध्या कोणत्या पक्षात आहोत? उद्या कोणत्या पक्षातून निवडणूक लढणार हे माहीत नसलेल्या आणि ज्यांचे अद्याप राजकीय डोळेही उघडले नाहीत त्या विजयसिंह पंडितांचे या तालुक्याच्या जडणघडणीत काय योगदान आहे? पैशाच्या आणि बापाच्या जीवावर राजकारणात नशीब आजमावण्याचा प्रयत्न करणाऱ्या विजयसिंह पंडितांनी अगोदर जनतेची सेवा करावी. त्यांच्या अडीअडचणी समजून घ्याव्यात आणि मगच आमदारकीचे स्वप्न पहात आमच्यावर आरोप करावेत, असे सडेतोड प्रतिपादन बदामराव पंडित यांनी केले आहे.

## कर्तृत्ववान स्त्रीयांच्या कार्याचा वारसा पुढे न्यावा-प्रा.डॉ.सौ.प्रणिता देशपांडे




**परभणी । प्रतिनिधी**

येथील शारदा महाविद्यालयात अंतर्गत महिला तक्रार निवारण कक्ष च्या वतीने जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी झालेल्या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ श्यामसुंदर वाघमारे तर प्रमुख अतिथी म्हणून पैठण येथील संत पिठाच्या प्रा डॉ सौ प्रणिता देशपांडे उपस्थित होत्या. तर यावेळी व्यासपिठावर अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा डॉ संतोष नाकाडे, प्रा डॉ सौ वैशाली देशपांडे, प्रा डॉ उज्वला जगताप उपस्थित होत्या.यावेळी बोलतांना प्रा डॉ सौ प्रणिता देशपांडे यांनी प्राचीन काळापासून आजपर्यंतच्या भारतीय स्त्रीयांच्या कार्यकर्तृत्वाचा सविस्तर आढावा घेऊन आपल्या देशातील कर्तृत्ववान स्त्रीयांच्या कार्याचा आदर्श घेऊन वाटचाल केली तर मुलींची वाटचाल आणखीन दैदिप्यमान होईल असे मत प्रतिपादन केले. यावेळी सौ उज्वला बल्लाळ, सौ अरुणा पाटील, प्रा डॉ सौ वर्षा सूर्यवंशी, कु. गायत्री शिंदे,प्रा डॉ संतोष नाकाडे यांनी आपली मनोगते व्यक्त केली. यावेळी विविध कार्यक्षेत्रात ज्यांनी योगदान दिले अशा अनेक कर्तृत्ववान महिलांना सत्कार यावेळी करण्यात आला.यावेळी झालेल्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. श्रद्धा अडने, कु. गायत्री शिंदे यांनी तर प्रास्ताविक प्रा डॉ सौ उज्वला जगताप यांनी केले. आभारप्रदर्शन कु. श्रद्धा अडने यांनी तर तर प्रा डॉ सौ वैशाली देशपांडे यांनी प्रमुख पाहुण्याचा परिचय करून दिला.यावेळी झालेल्या प्राध्यापक वृंद प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा डॉ सौ अंजली शिंदे,प्रा डॉ सौ वर्षा सूर्यवंशी,श्रीमती लीलाबाई गायकवाड, श्रीमती सुनंदा राजगुरू, कु. तनुजा रासवे यांनी प्रयत्न केले.

## पाटोदा बस स्थानक झाला झोपनाऱ्यांचा अड्डा

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा आगाराचे बस स्थानक वरीष्ठ अधिकारी व कर्मचारी यांनी प्रवाशासाठी अतिशय दर्जेदार केलेले असुन, अजुनही काम प्रगती पथावर आहे, या मध्ये तिळमात्र शंका नाही पण काही प्रवाशी व मोकार यांनी लोकांनी बस स्टंड म्हणजे झोपायचा अड्डाच समजला आहे. शहरात तालुक्यातून अनेक गाव खेड्यातुन प्रवाशी, विद्यार्थी येतात व जातात गाड्या येण्यास कधी कमी जास्त वेळ लागतो पण बसण्याची सुविधा उपलब्ध असुन ही काही लोक आसनावर झोपले असल्यामुळे इतर प्रवाशांचे हाल होत आहेत. तरी संबंधीत आगारातील अधिकारी, कर्मचारी यांनी बस स्टंड मध्ये सुरक्षा रक्षकाची नियुक्ती करून ये जा करणाऱ्या विद्यार्थी व प्रवाशी यांची गैरसोय टाळावी अशी चर्चा शहरातील व तालुक्यातील प्रवासी नागरिक करीत असून संबंधित अधिकारी यांनी योग्य ते पाऊले उचलावीत व एक कायमस्वरूपी सुरक्षा रक्षक बस स्टड मध्ये नियुक्त करावा.



## निमित्त गाव भेटीचे,पण तयारी लोकसभेची

**मंगळवेढा** – लोकसभा निवडणूक व भाजपाचा उमेदवार अद्याप जाहीर झाला नसताना देखील आ. प्रणिती शिंदे यांनी गाव भेट दौऱ्याच्या निमित्ताने तालुक्याच्या ३२ गावांचा दौरा दोन टप्प्यात पूर्ण केला. निमित्त जरी गावभेट दौऱ्याचे असले तरी यातून लोकसभेच्या प्रचाराची पहिली फेरी केली. लोकसभा निवडणुकीतील सलग दोन पराभवाने सावध झालेल्या काँग्रेस पक्षाने यंदा सावध पावले टाकण्यास सुरुवात केली सध्या काँग्रेसचे संभाव्य उमेदवार म्हणून आ. प्रणिती शिंदे यांचे नाव चर्चेत आहे. त्या दृष्टीने जिल्ह्यात काँग्रेसचे राजकीय मोर्चेबांधणी सुरू झाली तालुक्यामध्ये दुष्काळाची भीषण तीव्रता असल्याने जनावराच्या चाऱ्यासह पिण्याच्या व शेतीचे पाण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागत आहे.३९ गावाची भोसे प्रादेशिक पाणीपुरवठा योजना चालू असले तरी या योजनेचे पाणी अवेळी येत आहे. पाणी पुरवठ्यामध्ये योग्य समन्वयाचा अभाव आहे. रखडलेला पंढरपूर विजयपूर रेल्वे मार्ग जनावराच्या चाऱ्याची टंचाई आहे. याशिवाय मजुरांच्या हाताला काम, बेरोजगारीसह विकास कामाचा प्रश्न उभा असताना दुष्काळी निकषातून मंगळवेढ्याला वगळल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले.आ. प्रणिती शिंदे यांना २४ गावातील काही पदाधिकाऱ्यांनी या प्रश्न लक्ष घालण्याची विनंती केल्यानंतर त्यांनी त्याबाबतचा प्रश्न अर्थसंकल्पीय अधिवेशनात उपस्थित करून प्रत्यक्ष पाहण्यासाठी या गावाचा दौरा केला. त्या दौऱ्यामध्ये पाटकळ येथे पाणी प्रश्न व मराठा आरक्षणावरून स्थानिक ग्रामस्थांच्या रोषाला सामोरे जावे लागले असले तरी इतर गावात त्यांना चांगला प्रतिसाद मिळाला.त्यामुळे लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराची धनश्री परिवाराचे शिवाजीराव काळुंगे, जिल्हा कार्याध्यक्ष ॲड नंदकुमार पवार, तालुकाध्यक्ष प्रशांत साळे, पांडुरंग जावळे, विष्णुपंत शिंदे, मनोज माळी,



ॲड रविकिरण कोळेकर,राजेंद्र चेळेकर ,सुरेश कोळेकर, संदीप पवार, शिवशंकर कवचाळे, मारुती वाकडे, दिलीप जाधव,अजय अदाटे ,जयश्री कवचाळे,शाहीन शेख यांच्या पुढाकाराने पहिली फेरी पूर्ण झाली.या दौऱ्यात त्यांनी जिल्ह्यात मी एकमेव विरोधी आमदार आहे. माझ्याकडे कोणती संस्था किंवा कारखाने नसल्यामुळे ईडीची भीती नाही त्यामुळे मी तुमचे प्रश्न नीटपणे आणि अभ्यासू पद्धतीने मांडू शकते. असे सांगून माझ्या कामाची पद्धत वेगळी आहे. एखादा विषय मी चांगल्या पद्धतीने मांडताना राजकारणापेक्षा मला समाजकारणामध्ये अधिक रस असले सांगत लोकांचा कौल व प्रश्न जाणून घेण्यात त्या तुर्त तरी सत्ताधाऱ्यापेक्षा सरस ठरल्या आहेत.गाव भेट दौऱ्यात राईनपाडा हत्याकांड नातेवाईकांनी नोकरीची मागणी सरकारने पूर्ण केली नाही. भोसे येथे रेशनचा माल मिळत नाही, खरीप व रब्बीचा पीक पिक विम्यात महसूल मंडळ वगळणे, रस्ते, दुष्काळी परिस्थितीत शेती पंपाला दिवसा वीजपुरवठा करणे, नीट परीक्षा, मंगळवेढा शिवारातील कडबा दुष्काळी गावाला वाटप करणे इतर अन्य प्रश्नांची देखील मागणी या दौऱ्यात करण्यात आली.

# कृषी महाविद्यालयात शेतकऱ्यांना मिळाला सघन फळबाग लागवड तंत्रज्ञानाचा मूलमंत्र

**आनंदवन । प्रतिनिधी**

महारोगी सेवा समिती संचालित आनंद निकेतन कृषी महाविद्यालय, वरोरा, येथे महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ पुणे, आ.नि.कृ.म, वरोरा आणि कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आनंद निकेतन कृषी महाविद्यालय वरोरा मध्ये राष्ट्रीय फलोउत्पादन मंडळ - एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान अंतर्गत सघन फळबाग लागवड तंत्रज्ञान व काढणी पश्चात व्यवस्थापन या विषयावरील निःशुल्क व निवासी शेतकरी प्रशिक्षणाचे आयोजन दि ११ ते १३ मार्च २०२४ या दरम्यान करण्यात आले होते.

प्रशिक्षणाचे उद्घाटन दिनांक ११/०३/२०२४ रोजी प्राचार्य डॉ. सुहास पोतदार,सूचित लकडे, विषय विशेषज्ञ, कृषी विज्ञान केंद्र गडचिरोली, मिली पुसदेकर, सहाय्यक प्राध्यापक ( उद्यानविद्या) यांच्या उपस्थितमध्ये संपन्न झाले . सदर प्रशिक्षणात चंद्रपूर, नागपुर, भंडारा जिल्ह्यातील एकूण ३४ प्रशिक्षणार्थीनी सहभाग घेतला.





सदर प्रशिक्षणात सघन फळबाग लागवड तंत्रज्ञान संधी व आव्हाने, आंबा, संत्री, मोसंबी, पेरू या पिकातील सघन फळबाग लागवड, सघन फळबाग मधील यांत्रिकीकरण, फळबागेत एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन, एकात्मिक पीक संरक्षण, प्रमुख फळपिकातील काढणी व प्रक्रिया, फळपिकांचे विक्री व निर्यात या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले.यासोबतच या प्रशिक्षणात छाटणी तंत्रज्ञान, फर्टिगेशन, बहार व्यवस्थापन, फळगळ नियंत्रण उपाय याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले.

या प्रशिक्षणात सूचित लकडे, विषय विशेषज्ञ (उद्यानविद्या), कृषी विज्ञान केंद्र गडचिरोली, डॉ.सुहास पोतदार, प्राचार्य, आ नि कृ म वरोरा, मिली पुसदेकर, डॉ मनोज जोगी, राजेश रहाटे, नितीन गजभे, डॉ. अनिल भोगावे, सहायक प्राध्यापक, आ. नि. कृ. म, वरोरा, प्रविण वानखेडे, युनिव्हर्सल एक्सपोर्ट, नागपूर या तज्ञांनी मार्गदर्शन केले. प्रशिक्षणा अंतर्गत आनंदवन फळबाग प्रक्षेत्र, याठिकाणी क्षेत्रीय भेटीचे आयोजन करण्यात आले होते.तीन दिवसीय प्रशिक्षण अत्यंत उत्साहात पार पडले तसेच प्रशिक्षणार्थीनी या प्रशिक्षणाबाबतीत समाधान व्यक्त केले. प्रशिक्षणाच्या समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास पोतदार , यांनी भूषविले तसेच प्रमुख अतिथी म्हणून प्रविण वानखेडे, संचालक, युनिव्हर्सल एक्सपोर्ट, नागपूर व प्रशिक्षण कार्यक्रम संयोजिका मिली पुसदेकर हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन हे डॉ. अनिल भोगावे यांनी केले.

# भाजपा हा सामान्य कार्यकर्त्यांचा पक्ष - खा.रामदास तडस

**पुलगाव । प्रतिनिधी**


भारतीय जनता पक्ष हा सामान्य कार्यकर्त्यांचा पक्ष असल्यामुळे सर्वसामान्य जनतेला न्याय देण्याचे कार्य या पक्षामध्ये होत असते. भारतीय जनता पक्षाचा सामान्य कार्यकर्ता पक्षाच्या सर्वोच्च स्थानी पोहोचू शकतो. त्यामुळेच ओबीसींना न्याय द्यायचे कार्य भाजपमध्ये सतत सुरू आहे. त्यामुळे ओबीसी मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी सर्वसामान्य जनतेला पक्षाच्या मागे उभे करून पुन्हा एकदा देशामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षाची सत्ता आणायची आहे. त्यासाठी संपूर्ण शक्ती पणाला लावून सर्वांना कार्य करायचे आहे. ज्यामुळे जगात पुन्हा विश्वगुरू म्हणून आपल्या भारताचे स्थान निर्माण होईल असा विश्वास वर्धा लोकसभा क्षेत्राचे खा. रामदास तडस यांनी व्यक्त केला.

पुलगाव देवळी विधानसभा क्षेत्रातील ओबीसी सामाजिक संमेलनाला ते संबोधित करीत होते. महाविजय २०२४ च्या अनुषंगाने गृहक्षेत्र असलेल्या पुलगाव- देवळी विधानसभेच्या ओबीसी सामाजिक संमेलनात उपस्थित राहून ओबीसी मोर्चा महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष संजय गाते यांनी मार्गदर्शन केले. २०२४ च्या निवडणुकीत समग्र ओबीसी समाजाने मोदीजींच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून विकासपुरुष नरेंद्र मोदीजींना विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्याकरिता पुन्हा एकदा पंतप्रधान करण्याकरिता संकल्पबद्ध व्हावे, असे आवाहन



केले.यावेळी मंचावर भाजपा ओबीसी मोर्चा महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष संजय गाते, भाजपा वर्धा जिल्हाध्यक्ष सुनील गफाट,खासदार रामदास तडस,माजी खासदार सुरेश वाघमारे,विधानसभा निवडणूक प्रमुख राजेश बकाने,भाजपा जिल्हा सरचिटणीस राहुल चोपडा,किसान मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष मिलिंद भेंडे,ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष मंगेश झाडे, भाजपा पुलगाव-देवळी विधानसभा प्रमुख दिपक फुलकरी,प्रदेश काका सदस्य किरण उरकांदे, राजीव बत्रा,महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष वैशाली येरावार,भाजपा जिल्हा उपाध्यक्ष जयंत येरावार, विवोक्त जमाती उपाध्यक्ष शंकर भानारकर ,माजी जिप सदस्य प्रविण सावरकर,माजी पस सदस्य किशोर गव्हाळकर,ओबीसी मोर्चा प्रदेश काका सदस्य रमेश वाळके ,भाजपा सेवाग्राम मंडल अध्यक्ष नंदू झोटिंग,ओबीसी मोर्चा जिल्हा महामंत्री अरविंद नाकतोडे, ओबीसी मोर्चा विधानसभा प्रमुख नीलिमा पळसकर,माजी नगराध्यक्ष शितल गाते, ओबीसी मोर्चा शहर अध्यक्ष अनिल लेकुरवाळे,देवळी ग्रामीण अध्यक्ष रूपेश आडेकर,सेवाग्राम अध्यक्ष सुशील वडतकर,देवळी शहर अध्यक्ष राम खोंड,कानगाव मंडळ अध्यक्ष अरुण मेघरे, नाचणगाव-गुंजखेडा मंडळ अध्यक्ष राहुल घाटे,ओबीसी मोर्चा जिल्हा पदाधिकारी राजेश गुप्ता,संदीप बोरकुटे, राजीव जैस्वाल,चंद्रशेखर बेले, प्रशांत लोणकर,आंबटकर ,प्रफुल मंथनवर,महिला मोर्चाच्या जयश्री मोकदम, शुभांगी कासार, चंदा ढगे सह मोठ्या संख्येत भाजपा, ओबीसी मोर्चा पदाधिकारी ओबीसी मोर्चा पुलगाव महासचिव प्रशांत लोणकर ,विजय ढगे, महिला संयोजिका प्रगती महाजन, संजय डोरलीकर ,कैनया शाहू, संतोष गंगुलवार ,नरेंद्र मानकर भाजपा महिला आघाडी महामंत्री संगीत शहाकार भाजपा युवा मोर्चा कार्यकर ओबीसी बंधू भगिनी उपस्थित होते.या कार्यक्रमाचे संचालन अरविंद नागतोडे व आभार प्रदर्शन भाजपा ओबीसी मोर्चा शहराध्यक्ष अनिल लेकुरवाळे यांनी केले.

## लोकसभेला प्रत्येक गावातून तीन-चार उमेदवार; निवडणूक बॅलेट पेपरवरच घेण्यास भाग पाडण्याची मराठा समाजाची रणनीती



**सोलापूर -**आगामी लोकसभा निवडणुकीत प्रत्येक गावातून तीन ते चार उमेदवार उभे करावेत. एका-एका मतदार संघात एक ते दीड हजार उमेदवार उभे करावेत. कोणत्याही परिस्थितीत सरकारला बॅलेटपेपरवरच निवडणुका घेण्यास भाग पाडावी, अशी रणनीती मराठा समाजाने आखली आहे.

रविवारी दुपारी शासकीय विश्रामगृहात सकल मराठा समाजाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक झाली या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या बैठकीचे प्रास्ताविक गणेश देशमुख यांनी केले. यावेळी माऊली पवार, पुरुषोत्तम बरडे, राजन जाधव, मिलिंद भोसले,भक्ती जाधव, पंडित ढवण, बालाजी सिरसट,गोविंद पाटील यांच्यासह अनेक पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रा. रामदास पौळ, संदीप मांडवे, किरण घाडगे, दीपक वाडेकर शिवाजी कदम, बंडू ढवळे, अरविंद केदार यांनी यावेळी विचार व्यक्त केले.राज्य सरकारने दिलेले दहा टक्के आरक्षण मराठा समाजाला अमान्य असून याचा काहीही उपयोग नाही. हे आरक्षण केंद्र सरकारच्या नोकऱ्यात नाही. विविध शैक्षणिक प्रवेश परीक्षांसाठी व नोकऱ्यांसाठी याचा काहीच उपयोग नाही. यामुळे ओबीसीतून ५० टक्क्यांच्या आतच आरक्षण मिळावे या मागणीवर मराठा समाजाने ठाम राहावे असा निश्चय यावेळी करण्यात आला.गुणरत्न सदावर्ते यांना सोलापूर मतदारसंघातून भाजपच्या वतीने तिकीट दिले जाण्याचे वृत्त आहे. सदावर्ते यांच्या पाठीशी भाजपच आहे. भाजप स्वतः आरक्षण देते आणि स्वत:च सदावर्ते यांना पुढे करत काढून घेते. मराठा समाजाचा सुरवातीपासूनच आरोप या उमेदवारीमुळे सिद्ध होणार आहे. जर भाजपने सदावर्ते यांना तिकीट दिले तर भाजपचा मराठा समाजाचा कोणता नेता प्रचारासाठी येतो तेच आम्ही पाहू असे आव्हान माऊली पवार यांनी केले.



**बोन्ड (राजूली )येथील गृहिणी दुर्गेशनंदनी बांगरे यांचे घरी बाजारातून आणलेले चित्रविचित्र आकाराचे वांगे. काही वांगे यांना सोंड आहेत तर काही दिलच्या आकाराचे.त्यामुळे बघतांना कुतूहल वाटते. छाया :प्रणय बांगरे.**

# महावितरणच्या रडारवर थकबाकीदार; दोन लाख ग्राहकांचा वीजपुरवठा होणार खंडित

**सोलापूर :** थकीत वीजबिलांचा भरणा न केल्यामुळे महावितरणकडून वीजपुरवठा खंडित केला जात आहे. थकबाकीची रक्कम व नियमानुसार पूनर्जोडणी शुल्क अधिक जीएसटी घेतल्याशिवाय पुन्हा वीजपुरवठा सुरू केला जाणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.पश्चिम महाराष्ट्रातील तब्बल ४५ हजार थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित केला आहे. त्यात आता सोलापूर जिल्ह्यातील दोन लाख ग्राहक महावितरणच्या रडावर आहेत.पश्चिम महाराष्ट्रातील घरगुती, वाणिज्यिक व औद्योगिक १४ लाख १६ हजार ३०० ग्राहकांकडे २५४ कोटी २० लाख रुपयांची थकबाकी आहे.

यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील एक लाख ९६ हजार ९१५ ग्राहकांकडे ३१ कोटी ९४ लाख रुपयांची थकबाकी आहे. थकबाकीमुळे गेल्या महिन्याभरात सोलापूर जिल्ह्यातील सहा हजार १५४ ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला आहे.आर्थिक अडचणीतील 'महावितरण'ने थकीत रक्कम किती आहे हे न पाहता आता नियमानुसार वीजपुरवठा खंडित करण्याची धडक कारवाई सुरु केली आहे. त्यामुळे थकबाकीदारांनी ु.ारहरवळीलो.ळप या वेबसाइटवर तसेच महावितरणच्या मोबाईल ॲपद्वारे वीजबिल भरावे.थकबाकी न भरल्यास ऐन उन्हाळ्यात ग्राहकांना उकाड्याचा त्रास सोसावा लागणार आहे. पाच हजार रुपयांपेक्षा अधिक बिल असणाऱ्या सर्व लघुदाब ग्राहकांना आरटीजीएस किंवा एनईएफटीद्वारे वीजबिल भरण्याची सुविधा देखील उपलब्ध असल्याचे 'महावितरण'ने स्पष्ट केले आहे.केंद्र सरकारकडून ग्राहकाला एक किलोवॉटसाठी ३० हजार रुपये, दोन किलोवॉटसाठी ६० हजार व तीन किलोवॉटसाठी ७८ हजार रुपयांचे अनुदान आहे. ग्राहकांनी https://pmsuryaghar.gov.in या पोर्टलवर ऑनलाइन नोंदणी करावी.'पीएम सूर्यघर' प मोबाईलमध्ये उपलब्ध आहे. एक किलोवॅटच्या रूफ टॉप सोलरमधून दररोज चार युनिट अर्थात दरमहा सुमारे १२० युनिट वीज तयार होते. महिना १५० युनिटपर्यंत वीज वापर करणाऱ्या कुटुंबाला दोन किलोवॉटपर्यंतच्या क्षमतेची सोलर सिस्टिम पुरेशी आहे. घराच्या छतावर रूफ टॉप सोलर वीजनिर्मिती प्रकल्प बसवून सौरऊर्जेचा वापर करून वीजनिर्मिती करायची व ती वीज घरी वापरून विजेची गरज पूर्ण करायची, अशी ही योजना आहे.

# शंकरपुरात चिमुकल्यांनी ठेवला पहिला रोजा

## आत्म्याच्या शुद्धीकरणासाठी रोजा पाळण्याची गरज

चिमूर तालुक्यातील शंकरपूर येथील रहिवासी अवघ्या सात वर्षा खालील चिमुकल्यांनी पहिला रोजा ठेवल्याने आश्चर्याचा विषय ठरला आहे. परिसरात त्यांचे कौतुक ही केल्या जात आहे.मुस्लिम धर्माचा पवित्र महिना रमजान ला दिनांक १२ मार्च २०२४ ला सुरुवात झाली असून या पवित्र धार्मिक महिन्यात समाजातील अनेक लोक श्रद्धेने रोजा पाडतात. रमजान हा इस्लामिक पंचांग मधील नववा महिना आहे. हा महिना जगभरातील मुस्लिम उपवासाचा (रोजाचा) महिना म्हणून पाळतात. हजरत मुहम्मद (सल्ल) पैगंबर च्या पहिल्या प्रकटीकरणाची आठवण म्हणून रमजानचे वार्षिक पाळणे इस्लामच्या पाच स्तंभांपैकी एक मानले जाते. आणि चंद्रकोर चंद्राच्या एका दिसण्यापासून दुसऱ्यापर्यंत, एकोणतीस ते तीस दिवस टिकते.



याच मुस्लीम बांधवांच्या उपवासाच महिन्याला प्रारंभ झाला आहे. यालाच 'रमजान' अर्थात 'बरकती' चा महिना म्हणतात. मनामनातील दरी कमी करून परस्परांमध्ये स्नेहभाव, सद्भाव वाढविणारा हा महिना. संयम, त्याग, शांती, सहिष्णुता, चांगुलपणा, प्रामाणिकपणा, परोपकार माणसांच्या ठायी रुजविणारा हा महिना. माणसाला वाईटापासून, वासनेपासून शेकडो मैल दूर ठेवणारा हा महिना. मनातील इच्छा, मनोकामना पूर्ण करणार्या, बरकतीची मुक्तपणे उधळण करणार्या या महिन्याच्या चंद्राची तमाम



शेषराव राऊत

मुस्लीम बांधव अधीरतेने प्रतीक्षा करीत असतात. चंद्राच्या दर्शनाने प्रत्येकाच्या चेहर्यावर प्रसन्नतेची पहाट फुलत असते. घरादारात, मुहल्ल्यात आनंद भरभरून ओसंडत असतो. मुस्लीम बांधव आपापसातील वैरत्व, द्वेष विसरून हस्तांदोलन करतात, आलिंगन देतात. त्यांच्या निखळ जिव्हाळ्याने संपूर्ण वातावरण स्नेहमय होऊन जातो. संपूर्ण महिनाभर अत्यंत कडकडीत रोजे, पाच वेळेचा नियमित नमाज, कुराणपठण अन् अल्लाहचे स्मरण , चिंतन करायचे असते तसेच गोर गरिबांवर आपुलकीचे हात ठेवत आपल्या वर्षभरातील एकूण अर्थार्जनातून २.५% रक्कम दान देणे. या तीस दिवसात उपासधारकांच्या तनमनाची शुद्धी होते. म्हणून इस्लाम धर्मात रमजान महिन्याला अनन्य साधारण महत्त्व देण्यात आले आहे. आणि त्यामुळेच हा महिना अत्यंत पवित्र अन् मंगलमय मानला गेला आहे. ईश्वराच्या प्रसन्नतेची, विशालतेची साक्ष देणारा महिना म्हणूनही या महिन्याचे आगळेवेगळे स्थान अबाधित आहे. माणसाला त्याच्या भलबुर्याची, पाप-पुण्याची जाणीव करून देणार्या या महिन्यात उपवास (रोजा) करायचे असतात. उपवास म्हणजे आत्म्याचे, आचारविचारांचे शुद्धीकरण होय. माणसाच्या या आचार-विचारांच्या शुद्धीकरणाची ही निकड कितीतरी वर्षापूर्वी सांगण्यात आली आहे. आजही त्याची नितांत निकड भासते. यावरून पैगंबरांच्या दूरदृष्टीची कल्पना आपल्याला सहजगत येऊ शकते. रमजानमधील रोजा म्हणजे सूर्योदयापासून (सहरीपासून)सूर्यास्तापर्यंत (इफ्तारपर्यंत) निव्वळ अन्न-पाण्यापासून दूर राहून, भुकेची जीवघेणी यातना सहन करणे एवढेच नव्हे, तर आखून देण्यात आलेली कुंपणे, बंधने, मर्यादा यांचे तंतोतंत पालन या महिन्याच्या वर्तुळात राहून करणे होय. या महिन्यातील बंद्याची इबादत अल्लाहला अधिक पसंत असते.अनीती, अनाचार, अत्याचार, अवास्तव या गोष्टींकडे कानाडोळा करून दुनियेतल्या चांगुलपणावर, मांगल्यावर अंत:करणपूर्वक प्रेम करणे, डोळ्यात पावित्र्य साठविणे, मनात नीतिमूल्यांची जपणूक करणे, परोपकाराची भावना रुजविणे, कानांना फक्त चांगले, उदात्त, विधायक विचार ऐकण्याची सवय लावणे, एकमेकांना मदत करणे ही या महिन्याची विशेष शिकवणूक. महिनाभराच्या त्यागाने, शुद्ध आचरणाने तावून सुलाखून निघालेल्या रोजदारांनी ईदचा शिरकुर्मा आनंदाने प्यायचा असतो. ईद म्हणजे आनंदोत्सवच. जो एकमेकांच्या शुभेच्छांनी, सदिच्छांनी साजरा कराचा असतो. हे या महिन्याचे सर्व नियम तंतोतंत पाडून ते आचरणात आणण्यासाठी या लहानशा चिमुकल्यांनी या पवित्र रमजान महिन्याचा व आपल्या आयुष्याचा प्रथम रोजा माईरा शेख, अलविरा शेख, आयात शेख, अलिजा शेख, हुजैफ शेख, अब्रम शेख यांनी ठेवून समाजापुढे एक आदर्श निर्माण केला आहे. त्यामुळे परिसरात त्यांचे अभिनंदन होत आहे.

# दारूच्या नशेत एका ऊसतोड कामगाराचा विहिरीत पडून मृत्यू

**मोहोळ -** दारूच्या नशेत एका ऊसतोड कामगाराचा विहिरीत पडून मृत्यू झाल्याची घटना सौंदणे, ता. मोहोळ येथे (ता. ११ मार्च) रोजी सायंकाळी ६ वाजता घडली. हुजूरसाब तुराबसाब शेख (वय-४१) रा. महात्मा फुले नगर, भोकर, जिल्हा नांदेड असे मृत ऊसतोड कामगाराचे नाव आहे.मोहोळ पोलिसाकडून मिळालेल्या माहिती नुसार, भोकर येथील ऊसतोड कामगारांची टोळी सध्या सौंदणे येथे ऊस तोडणी करीत आहे. ही टोळी मुकादम राजकुमार आडे यांच्या देखरेखीखाली कार्यरत आहे. सोमवारी दुपारी या टोळीतील हुजूरसाब शेख हा मजूर दारू पिऊन तो राहत असलेल्या झोपडीत येऊन झोपला.दुपारी एक वाजता तो मी बाहेर जाऊन येतो असे सांगून घरातून गेला. सायंकाळचे सहा वाजले तरी तो परत आला नाही. त्यामुळे पत्नी शाहीन शेख व त्याच्या इतर मुलांनी शोध घेतला. परंतु हुजूरसाब मिळून आला नाही.दरम्यान, मुकादम राजकुमार आडे याला सचिन प्रल्हाद जाधव याचा फोन आला की त्रिंबक तुळशीराम डोंगरे यांच्या शेतातील विहिरीत हुजूरसाब हा पडला आहे. तुम्ही लवकर या असे सांगितले. त्यावेळी पत्नी शाहीन व त्याच्या इतर मुलांनी जाऊन पाहिले असता हुजूरसाब हा विहिरीच्या तळाशी गेला होता.गणेश जाधव व सचिन जाधव यांनी विहिरीत त्याचा शोध घेतला परंतु तो मिळून आला नाही. ही घटना पोलिसांना कळविल्या नंतर पोलीस उपनिरीक्षक लोबो चव्हाण यांच्या पथकाने येऊन संबंधित विहिरीवरील मोटारीने पाणी उपसले व दुपारी दोन वाजता हुजूरसाब चा मृतदेह बाहेर काढला.त्याला मोहोळ येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. या घटनेची खबर शाहीन शेख यांनी मोहोळ पोलिसात दिली असून अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक लोबो चव्हाण करीत आहेत.

### १६६७ कोटींच्या विकास कामाचे लोकार्पण व भूमिपूजन

# चंद्रपुरातील बॉटनिकल गार्डन महाराष्ट्राच्या वैभवात भर घालणारे–मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## पुढील तीन महिने बॉटनिकल गार्डन पर्यटनासाठी मोफत–पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूरला आजही 'चांदा' या नावाने ओळखले जाते. आज येथे १६६७ कोटी रुपयांच्या विविध विकास कामांचे भूमिपूजन व लोकार्पण होत असल्याने चांदाची खऱ्या अर्थाने चांदी आहे. येथील बॉटनिकल गार्डन हे जागतिक दर्जाचे असून महाराष्ट्राच्या वैभवात भर घालणारे आहे, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काढले.

चंद्रपूर येथे बॉटनिकल गार्डनचे लोकार्पण, एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या महर्षी कर्वे महिला सक्षमीकरण ज्ञान संकुलाचे भूमिपूजन तसेच चंद्रपूर महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा व मलनिस्सारण प्रकल्पाचे भूमिपूजन करताना ते बोलत होते. यावेळी मंचावर राज्याचे वने सांस्कृतिक कार्य मंत्री तथा चंद्रपूरचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार, खासदार अशोक नेते, आमदार किशोर जोरगेवार, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, भाजपा जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, महानगराचे जिल्हाध्यक्ष राहुल पावडे,वनविभागाचे प्रधान सचिव बी. वेणूगोपाल रेड्डी, प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा वनबल प्रमुख शैलेश टेंभुर्णीकर, प्रधान मुख्य वनसंरक्षक महीप गुप्ता, एसएनडीटी विद्यापीठाच्या कुलगुरू उज्वला चक्रदेव, जिल्हाधिकारी विनय गौडा, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, मनपा आयुक्त विपीन पालीवाल,डॉक्टर जितेंद्र रामगावकर आदी उपस्थित होते.

पर्यावरणाचे जतन व संवर्धन करण्यासाठी वनसंपदा वाढविणे गरजेचे आहे, असे सांगून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, येथील बॉटनिकल गार्डन हा राज्यासाठी एक आदर्श प्रकल्प आहे. चंद्रपुरात सर्वोत्तम गार्डन होण्यासाठी पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार पुढाकार घेतला. पर्यटनाच्या दृष्टीने अतिशय आकर्षक असे हे बोटॅनिकल गार्डन तयार झाले असून लोकांचा याकडे कल वाढेल. शैक्षणिक क्षेत्रात महर्षी कर्वे हे मोठे नाव आहे. त्यांनी स्थापन केलेल्या एसएनडीटी विद्यापीठाचे उपकेंद्र चंद्रपुरात होत आहे, येथील महिला व तरुणींसाठी ही अतिशय आनंदाची बाब आहे. सोबतच केंद्र शासनाच्या अमृत योजनेअंतर्गत चंद्रपूर महानगरपालिकेचे पाणीपुरवठा प्रकल्प आणि मलनिस्सारण प्रकल्प हे सुद्धा विकासाचे मोठे काम चंद्रपुरात होत आहे, याचा आनंद आहे.पुढे मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, चंद्रपूरला दूरदृष्टी असलेले सुधीरभाऊ सारखे लोकप्रतिनिधी लाभले आहे. हाती घेतलेले काम पूर्ण शक्तीनिशी करणारे ते मंत्रिमंडळातील माझे वरिष्ठ सहयोगी आहेत. गतकाळात अर्थमंत्री तसेच यावेळी वनमंत्री व सांस्कृतिक कार्य मंत्री म्हणून त्यांनी राज्यासाठी खूप मोठे काम केले आहे. त्यांच्या उपक्रमशीलतेमुळे वन खाते व सांस्कृतिक खाते बहरले आहे. आपल्या संस्कृतीची जोपासना कशी करायची, हे सांस्कृतिक कार्य विभागाने दाखवून दिले आहे. प्रत्येक विषयाची जाण असलेल्या सुधीरभाऊंनी चंद्रपूर जिल्ह्यात विकासाची गंगा आणली, असेही मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.वाघाच्या प्रेमापोटी या व्याघ्रभूमीत राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते बॉटनिकल गार्डनचे आज लोकार्पण करण्यात आले. पुढील तीन महिने पर्यटनासाठी बोटॅनिकल गार्डन मोफत असेल, अशी घोषणा राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य व जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केली.चंद्रपूर मध्ये नुकताच झालेला ताडोबा महोत्सव हा जागतिक दर्जाचा



ठरला असून २० कोटी लोकांपर्यंत ताडोबा महोत्सव पोहोचला आहे. तसेच डव्हॉटेज चंद्रपूर मध्ये विविध उद्योगांचे ७५ हजार कोटींचे सामंजस्य करार येथे करण्यात आले आहे. मोठ्या प्रमाणात चंद्रपूर मध्ये उद्योगांनी गुंतवणूक केली असून पुढील दहा वर्षात येथील बेरोजगारी संपुष्टात येईल.आज चंद्रपूर मध्ये एसएनडीटी विद्यापीठाच्या उपकेंद्रासाठी ५९० कोटी, बॉटनिकल गार्डनचा पहिला टप्पा २६४ कोटी, महानगरपालिकेची पाणीपुरवठा योजना २७० कोटी आणि मलनि:स्सारण प्रकल्प ५७० कोटी अशा एकूण १६६७ कोटी रुपयांचे भूमिपूजन आणि लोकार्पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते चंद्रपुरात आज करण्यात आले. निवडणुकीनंतरही चंद्रपुरातील कॅन्सर हॉस्पिटल, मेडिकल कॉलेज, बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र सैनिक स्कूल आदींचे लोकार्पण आणि भूमिपूजन करण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुन्हा एकदा चंद्रपूरला यावे, असे आवाहनही पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले.तत्पूर्वी मान्यवरांच्या हस्ते रिमोटद्वारे चारही प्रकल्पांचे भूमिपूजन व लोकार्पण करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला दीप प्रज्वलन करून राज्यगीताने सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी केले. ग्रामीण आदिवासी भागातील महिलांना कौशल्य विकास संदर्भातील अभ्यासक्रम सुरू करून स्थानिक महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने चंद्रपूर – बल्लारपूर मार्गावर विसापूर येथे ५० एकर जागेवर श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी (एस.एन.डी.टी.) महिला विद्यापीठ स्थापन करण्यात येणार आहे. यासाठी ५८९ कोटी ९३ लक्ष रुपयांची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. एस.एन.डी.टी. विद्यापीठाचे प्रस्तावित बांधकाम एकूण ८७२९० चौ. मीटरवर होणार असून यामध्ये शैक्षणिक इमारत, प्रशासकीय कार्यालये, सेमिनार हॉल, वर्गखोली, व्याख्यान सभागृह, बोर्ड मिटींग रुम, फॅकल्टी रुम, ७०० विद्यार्थीनींसाठी बाल्कनी व संलग्न शौचालय ब्लॉकसह दोन वसतीगृह इमारती, ग्रंथालय इमारत, डीजीटल लायब्ररी, ८६० क्षमतेची सभागृह इमारत, कॅफेटेरीया, भोजनगृह इमारत, क्रीडा सुविधांमध्ये बॅडमिंटन, टेनिस, बास्केटबॉल व विविध पारंपरिक खेळांकरीता इनडोअर स्पोर्टस् बिल्डिंग, व्यायामशाळा, कराटे, बॉक्सिंग, कुस्तीसाठी विशेष हॉल, दर्शकांसाठी गॅलरी, अतिथीगृह इमारत, कर्मचारी निवास आदींची तरतूद आहे.चंद्रपूर बल्लारपूर राष्ट्रीय महामार्गावर विसापूर येथे श्रद्धेय श्री. अटलबिहारी वाजपेयी वनस्पती उद्यान (बॉटनिकल गार्डनची) १०८ हेक्टर क्षेत्रात निर्मिती करण्यात आली आहे. बॉटनिकल गार्डन निर्मितीचे उद्देश : निसर्ग शिक्षण, मनोरंजन आणि निसर्ग पर्यटन यात वाढ करणे. स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे. फुल व फळ या शास्त्रासोबत रोपवाटिका तंत्राचा व व्यवस्थापनाचा पर्यावरणाच्या दृष्टीने हितकारक विकास करणे. रोपे लागवड आणि नवीन प्रजातींची ओळख करून उद्यान विज्ञानाचा वापर आणि व्यावसायिक कौशल्य विकसित करणे. तसेच वातावरण बदल व ग्लोबल वॉर्मिंग याबाबत जनजागृती घडून ग्रीन एनर्जीचा वापर करण्याकरिता प्रोत्साहन देणे.केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान २.० अंतर्गत चंद्रपूर महानगरपालिकेच्या २७० कोटी १३ लाख रुपयाच्या पाणीपुरवठा प्रकल्प व चंद्रपूर शहराकरिता प्रथम टप्प्यात ५४२ कोटी ५ लाख रुपयाचा मनानिस्सारण प्रकल्पाचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. या अंतर्गत शहरातील एकूण ५४ हजार घरगुती जोडणी करण्यात येईल.

# पोंभुर्णा येथील वैद्यकीय व दंत आरोग्य शिबिरात ७५१ रुग्णांची तपासणी

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील आदिवासी व बिगर आदिवासी जनतेला तालुका स्तरावर तज्ज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सेवा उपलब्ध व्हाव्यात, या हेतूने सार्वजनिक आरोग्य विभाग चंद्रपूर आणि राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत पोंभुर्णा येथील ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय व दंत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिराचे उद्धाटन पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते दूरचित्रवाणी द्वारे करण्यात आले. यावेळी तालुक्यातील ७५१ रुग्णांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पोंभुर्णाच्या नगराध्यक्षा सुलभा पिपरे तर प्रमुख अतिथी म्हणून वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. मिलिंद कांबळे, जिल्हा शल्य चिकित्स्क डॉ. महादेव चिंचोळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अशोक कटारे, डॉ. मंगेश गुलवाडे, विनोद देशमुख, अलका आत्राम अजय मस्के आदी उपस्थित होते. आरोग्य




शिबिरामध्ये एकूण ७५१ रुग्णांची तपासणी करण्यात आली. यापैकी २ मुख कर्करोग, १० हायड्रोसील, १ हर्निया, २९ मोतीबिंदूचे रुग्ण मिळाले. सदर रूग्णांवर शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव यांनी केले. संचालन भाग्यश्री भालेराव यांनी तर आभार निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. हेमचंद कन्नाके यांनी मानले. शिबिराकरीता शरद पवार दंत महाविद्यालय सावंगी मेघे, वर्धा, जिल्हा सामान्य रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी आणि ग्रामीण रुग्णालय, पोंभुर्णा येथील अधिकारी कर्मचा–यांनी सहकार्य केले. यावेळी अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भास्कर सोनारकर, तहसीलदार शिवाजी कदम, पोलिस निरीक्षक संजय सिंह, नगर पंचायत मुख्याधिकारी विकास चिडगलवार, संवर्ग विकास अधिकारी अरुण चनफने, बालविकास अधिकारी अमित लाडे, सागर खडसे, सचिन धोंडरे आदी उपस्थित होते.

# आय सी आय सी आय फाउंडेशन तर्फे जागतिक महिला दिन

**तळोधी (बा ) । प्रतिनिधी**

नागभीड तालुक्यातील वासाळा मक्ता येथे शुक्रवार ( दि.८ मार्च)रोजी आय सी आय सी आय फाउंडेशन व सामुहिक वनहक्क व्यवस्थापन समिती यांच्या संयुक्त विद्यमाने 'जागतिक महिला दिन' कार्यक्रम साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाला आय सी आय सी आय फाउंडेशनच्या डेव्हलपमेंट ऑफिसर रिता हटवार,आय सी आय फाउंडेशनचे कन्सल्टंट कम्युनिटी फॅसिलेटर विनोद डोंगरे,जितेंद्र मेश्राम,सदानंद भाकरे,वन समिती सचिव रामप्रकाश राऊत आदींची उपस्थिती होती. यावेळी रिता हटवार यांनी महिलांना व पुरुषांनाही मोलाचे मार्गदर्शन केले.आय सी आय सी आय फाउंडेशनचा उद्देश,उपक्रम व विकासात्मक योजनांची सविस्तर अशी माहिती सांगितली.यावेळी इतर मान्यवरांनी सुद्धा विविध विषयांवर मार्गदर्शन केले.तसेच महिलांसाठी गीतगायन यासारखे इतर उपक्रम घेऊन




जागतिक महिला दिन कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला.दरम्यान वासाडा मेंढा अंतर्गत येणाऱ्या वासाडा मक्ता या गावात आय सी आय सी आय फाउंडेशनने ९ हजार ७८ रोपे व खत पुरवठा करून फळबाग लागवड केलेली आहे.गावातील लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी तसेच त्यांना शाश्वत उपजीविका निर्माण करण्यासाठी फळबाग लागवडीचा उपक्रम आय सी आय सी आय फाउंडेशनने केला असल्याचे आयसीआयसीआय फाउंडेशनच्या रिता हटवार यांनी सांगितले.या कार्यक्रमाला गावातील बहुसंख्य महिला, गावातील प्रतिष्ठित व्यक्ती, व नागरीकांनी मोठी उपस्थिती दर्शवली होती.

# काँग्रेस नेते हेमंत लांजेवार यांचा सहकाऱ्यांसह भाजपात प्रवेश

## लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर काँग्रेसला मोठा धक्का

**चिमूर । प्रतिनिधी**

आमदार कीर्तिकुमार (बंटीभाऊ) भांगडीया यांच्या प्रमुख उपस्थितीत नागभीड येथील जनसंपर्क कार्यालयात नागभीड कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक तथा सरपंच ग्रा. पं. उसराळ मेंढा काँग्रेस नेते हेमंत लांजेवार यांच्यासह सहकाऱ्यांनी आमदार भांगडीया यांच्या कार्यक्षम, कणखर, कार्यकुशल नेतृत्वावर व त्यांच्या विकासकार्यावर, कार्यकर्तृत्वावर तसेच विकसनशील ध्येयधोरणांवर प्रभावित होऊन भाजपात पक्षप्रवेश केला. यावेळी आमदार भांगडीया यांनी त्यांच्या गळ्यात भाजपाचा दुपट्टा टाकून पक्षात सहर्ष स्वागत केले व पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. आगामी लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर काँग्रेस नेते हेमंत लांजेवार यांनी भारतीय जनता पार्टीत प्रवेश केल्यामुळे नागभीड तालुक्यात काँग्रेसला खिंडार पडले असून मोठा धक्का बसला आहे.

हेमंत लांजेवार यांनी पक्षप्रवेशाप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना म्हटले की, गेल्या अनेक वर्षांपासून मी काँग्रेसमध्ये सक्रीयतेने कार्यरत होतो. मागील दहा वर्षांत विविध जबाबदाऱ्या सांभाळल्या, सरपंच संघटना तालुकाध्यक्ष, जिल्ह्याच्या संघटनेच्या



अध्यक्षाची तसेच, वाढोणा–गिरगांव जिल्हा परिषद क्षेत्र प्रमुख म्हणून जबाबदारी स्वीकारली होती. त्यानंतर नागभीड कृषी उत्पन्न बाजार समितीत संचालक म्हणून निवडून गेलो. त्यानंतर या दहा वर्षांत आपल्या चिमूर विधानसभा क्षेत्राचे आमदार कीर्तिकुमार (बंटीभाऊ) भांगडीया यांचे कार्यकुशल असे नेतृत्व व त्यांच्या नेतृत्वात संपूर्ण क्षेत्राचा झालेला सखोल असा विकास यावर विश्वास ठेवून आज मी भाजपात पक्षप्रवेश केला आहे. ज्या पद्धतीने या पूर्वी काँग्रेसमध्ये सक्रीयतेने कार्यरत होतो, त्याच पध्दतीने आजपासून आमदार बंटीभाऊंच्या व भाजपा कार्यकर्त्यांच्या सानिध्यात अधिक जोमाने, मेहनतीने अहोरात्र प्रयत्न करून मनापासून काम करणार आहे. असे प्रतिपादन यावेळी त्यांनी केले.या पक्षप्रवेशाप्रसंगी प्रामुख्याने भाजपा तालुकाध्यक्ष संतोष रडके, भाजपा ओबीसी मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष राजू देवतळे, भाजपा ज्येष्ठ नेते मोरेश्वर ठीकरे, भाजपा ज्येष्ठ नेते वासुदेव पाटील गहाणे, भाजपा ज्येष्ठ नेते ईश्वर मेश्राम, भाजपा चिमूर विधानसभा निवडणूक प्रमुख गणेश तर्वेकर, भाजपा नेते जहांगीर कुरेशी, भाजपा नेते रमेश ठाकरे, भाजयुमो प्रदेश सचिव मनिष तुंम्पल्लीवार, नागभीड कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती अवेश पठाण, भाजपा चिमूर विधानसभा वॉर रूम प्रमुख सचिन आकूलवार, नागभीड कृषी उत्पन्न बाजार समिती उपसभापती रमेश बोरकर, भाजयुमो प्रदेश कार्यकारणी सदस्य परमानंद गहाणे, भाजपा तालुका महामंत्री जगदीश सडमाके, भाजयुमो तालुकाध्यक्ष देवानंद बावनकर, भाजपा ओबीसी आघाडी तालुकाध्यक्ष रामदास बाहेकर, नागभीड कृ.उ.बा. समिती संचालक राजेश घिये, माजी भाजपा तालुकाध्यक्ष होमदेव मेश्राम, भाजपा नेते – रमेश पा. बोरकर, धनराज बावनकर, अरविंद भुते, धनराज काटेखाये, अशोक ताटकर, धनंजय बोरकर , सोनू कटारे, राहुल करीये, संतोष बोळणे, प्रकाश अहिरकर, बाळू सिद्धमशेट्टीवार, शुभम चिल्लूरे, संजय गहाणे, पवन नागरे, सत्तार शेख, केदार मेश्राम, सुखदेव भाकरे, व्यंकटेश भाकरे, शिवा सहारे व अन्य भाजपा पदाधिकारी तथा कार्यकर्ते उपस्थित होते.

# भद्रावती येथे स्मृतिगंध काव्य संमेलन,१७ मार्चला

## स्वर्गीय विणा आडेकर स्मृती प्रतिष्ठानचा उपक्रम

**भद्रावती । यशवंत घुमे**

स्वर्गीय विणा आडेकर स्मृती प्रतिष्ठानच्यावतीने स्थानिक मुरलीधर पाटील गुंडावार सभागृहात स्मृतिगंध काव्य संमेलनाचे आयोजन करण्यात आलेले आहे. येत्या रविवारी दिनांक १७ मार्चला सकाळी ११ वाजता पहिल्या सत्रामध्ये उद्घाटन समारंभ आयोजित करण्यात आलेला आहे. या संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक तथा कवयित्री डॉ. प्रतिमा इंगोले (अकोला) उद्घाटक म्हणून प्रख्यात साहित्यिक डॉ. संध्या पवार(नागपूर) उपस्थित राहणार आहेत. प्रमुख अतिथी म्हणून जेष्ठ साहित्यिक ना.गो थुटे (वरोरा), ग्रामीण कथाकार अनंत भोयर(काटोल), भद्रावती येथील गट शिक्षणाधिकारी डॉ. प्रकाश महाकाळकर, सामाजिक कार्यकर्ते अमित गुंडावार, माजी नगराध्यक्ष अनिल धानोरकर, साहित्य समीक्षक डॉ.सुधीर मोते यांची विशेष उपस्थिती असणार आहे.




दुपारी साडेबारा वाजता दुसऱ्या सत्रात निमंत्रित कवींचे कवी संमेलन ठेवण्यात आले आहे. यावेळी डॉ. प्रतिमा इंगोले, डॉ. सध्या पवार, आचार्य ना.गो. थुटे, डॉ. विजय सोरते, अनंत भोयर, धनंजय साळवे, इरफान शेख चंद्रपूर (चंद्रपूर) आपल्या कविता सादर करतील. तिसरे सत्र दुपारी अडीच वाजता सुरू होईल. या सत्रात स्मृतिगंध गझल मैफिलीचे आयोजन करण्यात आले आहे.असून या मैफलितच्या अध्यक्षस्थानी लोकराम शेंडे (बुटीबोरी), बुटीबोरी उपस्थित असतील. जयंत वानखेडे (कोरपना), राम रोगे (नांदाफाटा), सुरेश शेंडे ( गडचिरोली), यांच्या उपस्थितीत यावेळी राजेश देवळकर (येनबोडी), प्रवीण तुराणकर (,राजुरा), मंगेश जनबंधू (ब्रह्मपुरी), दिलीप पाटील (राजुरा), प्रशांत भंडारे (आमडी),अर्जुन शेख (बल्लारपूर), अर्चना जूनघरे (राजुरा), नरेंद्र गंधारे (हिंगणघाट), सुनील बावणे (बल्लारपूर ),चंद्रशेखर कानकाटे (वरोरा) गणेश बेंदूर (वरोरा) आदी गझलकार आपल्या गझल सादर करणार आहेत.कार्यक्रमाच्या चौथे सत्र खुले कवीसंमेलन आयोजित करण्यात आले आहे. यावेळी अध्यक्षस्थानी चंद्रपूर येथील गीता देव्हारे उपस्थित राहणार आहेत. यावेळी दीपक शिव (आनंददन) ,सीमा भसारकर (चंद्रपूर), गोपाल शिरपूरकर (चंद्रपूर), जयंत लेंझे (सिंदेवाही), आरती रोडे (वरोरा), वसंत ताकघट (चंद्रपूर), रमेश भोयर (भद्रावती), देवेंद्र निकुरे (नागभीड), यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. दिवसभर चालणाऱ्या या भरगच्च कार्यक्रमांना भद्रावती नगरीतील तथा परिसरातील काव्य रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमांचा लाभ घ्यावा असे आवाहन स्वर्गीय विणा आडेकर स्मृती प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा स्मृतिगंध काव्यसंमेलनाचे संयोजक प्रवीण आडेकर, समन्वयक अनिल पिट्टलवार, उपाध्यक्ष बळवंत सुर्वे, सचीव रसिका आडेकर यांनी केले आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .